**प्रेसनोट**

**एम.आय.डी.सी.पो.स्टे.जळगांव**
**दि. 24/07/2025**

**प्रति,**

**दै.--------------- संपादक,**

**जळगांव**

**विषय :- एम.आय.डी.सी.पोलीसांनी कंपनीत चोरी करणारे चोरटे अवघ्या 08 तासांत केले जेरबंद....**

दि.20/07/2025 रोजीचे दुपारी 03.00 वाजेपासुन ते दि.22/07/2025 रोजीचे सकाळी 08.00 वाजेचे सुमारास जळगांव शहरातील एम.आय.डी.सी. व्ही सेक्टर येथील V-193 मधील भोसले इंडस्ट्रीजचे कंपाउंड मधुन सोया पनीर बनविण्याचे मशनरी व पार्टस तसेच हिरो होन्डा कंपनीची स्प्लेंडर प्रो मोटार सायकल असे एकुण 1,15,000/- रुपये किंमतीचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याने सुरेश रामचंद्र पाटील यांनी दिलेल्या तक्रारीवरुन एम.आय.डी.सी.पो.स्टे.येथे सिसिटिएनएस नं. 535/2025 अन्वये गुन्हा दाखल आहे.

जळगांव जिल्ह्यामध्ये तसेच एम.आय.डी.सी.पो.स्टे. हद्दीत मोटार सायकल चोरी व कंपनीतील चोरीच्या घटना वाढत असल्यामुळे मा.पोलीस अधीक्षक श्री महेश्वर रेड्डी, मा.अपर पोलीस अधीक्षक श्री अशोक नखाते यांनी चोरीच्या घटना उघडकीस आणुन आरोपी अटक करणेबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे मा.उपविभागीय पोलीस अधिकारी श्री संदिप गावित, मा. पोलीस निरीक्षक बबन आव्हाड यांनी गुन्हे शोध पथकातील अधिकारी व अंमलदार यांना घटनास्थळाची पाहणी करुन आरोपीताचा शोध घेणेबाबत सुचना देवुन मार्गदर्शन केले.

त्यानुसार गुन्हे शोध पथकातील पोलीस उप निरिक्षक राहुल तायडे, पोहेकॉ/गिरिष पाटील, पोकॉ/राहुल रगडे, पोकॉ/विशाल कोळी अशांनी सदर भागातील सिसिटिव्ही फुटेज प्राप्त करुन दोन अज्ञात इसम संशयास्पद फिरताना दिसुन आले. पोकॉ/राहुल रगडे व विशाल कोळी यांनी गुप्त बातमीदारामार्फत माहीती घेवुन त्यांची ओळख पटवुन त्यांना ताब्यात घेतले व सखोल चौकशी केली असता त्यांनी सदर गुन्ह्याची कबुली दिली. आरोपी नामे 1) प्रशांत उर्फ बाप्या पंडीतराव साबळे, 2) नितीन उर्फ मित्या रोहीदास चव्हाण, दोन्ही रा. सुप्रिम कॉलनी, जळगांव यांना सदर गुन्ह्यात दि.22/07/2025 रोजी अटक करुन मा.न्यायालयाने त्यांना दि.25/07/2025 रोजीपावेतो पोलीस कोठडी मंजुर केली आहे. त्यांच्याकडुन PCR दरम्यान चोरीस गेलेला 1,15,000/-रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोहेकॉ/संजिव मोरे, पोकॉ/मंदार महाजन हे करित आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
**जळगाव जिल्हा पोलीस**



एम.आय.डी.सी.
पोलीस स्टेशन जळगाव
फोन नं. 0257 - 2210500 / 2210163
WARNING
CCTV
SURVEILLANCE